कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे मुखपत्र


# कोल्हापूर चेंबर पत्रिका

POSTAL : REGN. NO. KLP-302/2012-2014

संपादक : ललित गांधी

वर्ष : ३ ◆ अंक : १० ◆ फेब्रुवारी २०१२ ◆ पाने : ४ ◆ मुल्यः १० रू. वार्षिक मुल्य १०० रू.

## भारतात जागतिक महासत्ता बनण्याची पुरेपुर क्षमता... लक्ष्मीनारायण मित्तल



**जागतिक स्टील किंग लक्ष्मीनारायण मित्तल यांच्या समवेत कोल्हापूर चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत सौ. उषा मित्तल.**

**जयपूर –** 'भारत' हा वेगाने विकसित होत असलेला देश असुन या देशामध्ये जागतिक महासत्ता होण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता असल्याचे प्रतिपादन जागतिक स्टील किंग व जगातील सर्वात श्रीमंत भारतीय उद्योजक लक्ष्मीनारायण मित्तल यांनी केले.

प्रवासी भारतीय परिषदेच्या निमित्ताने भारत दौऱ्यावर आलेल्या उद्योगपती लक्ष्मीनारायण मित्तल यांची 'अखिल भारतीय मारवाडी युवा मंच' चे राष्ट्रीय अध्यक्ष व 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स' चे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी भेट घेऊन व्यापार–उद्योगातील नवीन संधी, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग या विषयांवर सविस्तर चर्चा केली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मित्तल यांच्या पत्नी सौ. उषा मित्तल ही उपस्थित होत्या.

युवकांना व्यापार–उद्योगांत यशस्वी होण्यासाठी लक्ष्मीनारायण मित्तल यांनी मार्गदर्शन करावे अशी आग्रही विनंती ललित गांधी यांनी केली.

लक्ष्मीनारायण मित्तल यांनी यावेळी सांगितले की, भारत हा जगातील तरुणांचा देश असुन येणाऱ्या काळात सर्वाधिक युवकांची संख्या असणारा देश म्हणून ओळखला जाणार आहे. भारत ही माझी जन्मभूमी असल्याने या देशाच्या विकासासाठी मी नेहमीच प्रयत्नशील असणार आहे याप्रसंगी ललित गांधी यांच्यासमवेत जितेंद्र गुप्ता, संदीप भंडारी, रमण अग्रवाल, राज शर्मा इ. उपस्थित होते.राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत व उद्योगमंत्री राजेंद्र पारीक यांनी ही भेट घडवून आणण्यासाठी विशेष सहाय्य केले.

## जनता सहकारी बँकेचा ग्राहक मेळावा

**कोल्हापूर–** येथील जनता सहकारी बँकेचा ग्राहक मेळावा राजर्षी शाहू स्मारक भवन येथे उत्साहता संपन्न झाला. मेळाव्यामध्ये ग्राहकांना बँकेच्या वाटचालीबद्दल माहिती देण्यात आली तसेच ग्राहकांच्या प्रश्नांचे निवारणही करण्यात आले.

मजळाव्यास कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष आनंद माने अध्यक्षस्थानी होते. यचप्रसंगी जनता सहकारी बँकेच्या माध्यमातुन ग्राहकांना उत्तम सेवा मिळत असुन बँकेच्या येथुन पुढील वाटचालीत चेंबरचे सहकार्य व मार्गदर्शन दिले जाईल असे प्रतिपादन श्री आनंद माने यांनी केले.

आमदार चंद्रकांतदादा पाटील अतिरिक्त जिल्हा पोलिसप्रमुख संजय ऐनपुरे, पैलवान गणपतराव आंदळकर, बँकेचे संचालक सुधीर पंडीत, सरव्यवस्थापक वसंतराव कुलकर्णी, शाखाव्यवस्थापक आशिष कुवठेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

बँकेने खातेदार, ठेवीदार व भागधारक यांच्याशी जिव्हाळ्यांची नाळ घट्ट केली असल्याचे मत अनेक ग्राहकांनी यावेळी व्यक्त केले.




**जनता बँकेच्या ग्राहक मेळाव्यात मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष आनंद माने शेजारी सुधीर पंडित, वसंतराव कुलकर्णी, आशिष कुवठेकर.**

### ⊡ संलग्न संस्थांना आवाहन ⊡

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या सह व संलग्न संस्थांनी त्यांच्या विविध उपक्रमांच्या बातम्या कोल्हापूर चेंबरकडे पाठवाव्यात, त्यांना कोल्हापूर चेंबर पत्रिका मध्ये योग्य प्रसिध्दी देण्यात येईल. **- संपादक**

KCCI
कोल्हापूर चेंबर पत्रिका



## आनंद माने

अध्यक्ष : कोल्हापूर चेंबर

कोल्हापूर जिल्हा व शहर हे औद्योगिक व व्यापारदृष्ट्या अधिक प्रगतिशील होण्याकरिता पुष्कळसा वाव असुन त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार वाढीसाठी व आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे मात्र याकरिता विकासभिमुख प्रगती साधण्यासाठी असणारे अडथळे दूर होणे अत्यंत गरजेचे आहे.

कोल्हापूरचा औद्योगिकदृष्ट्या विचार करता फौंड्री उद्योग वाढत आहे. फौंड्री उद्योगाच्या वाढीसाठी व विकासासाठी काही मुलभूत सोयी व सुविधा मिळणे क्रमप्राप्त झाले आहे. स्पर्धेमध्ये टिकून राहणेसाठी नविन अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध करुन घेणे आवश्यक बनले आहे. कोल्हापूरला २-३ वर्षाच्या अथक प्रयत्नांतर फौंड्री क्लस्टर योजना मंजूर झाली आहे. त्यामुळे निश्चितच फौंड्री व्यवसाय अडचणीतून बाहेर पडण्यास मदत होणार आहे.

कोल्हापूरातील उद्योग वाढीसाठी व विकासासाठी अखंडीत विजपुरवठा असणे आवश्यक आहे. त्याबाबतीत शासन स्तरावर विजपुरवठा मुबलक व योग्य दरात उपलब्ध करुन घेण्यासाठी संघटीतपणे सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

कोल्हापूरचे विमानतळ अद्यापही सुरळीतपणे चालु होऊ शकलेले नाही. विमानतळावर असणाऱ्या सोयी व सुविधा अभावी कोल्हापूरच्या व्यापार-उद्योग तसेच आय.टी. उद्योगाच्या विकासाला खीळ बसलेली आहे. विमानसेवा लवकरात लवकर सुरळीतपणे चालु व्हावी अशी अपेक्षा आहे.

कोल्हापूर व कोकण हे रेल्वे सेवेने जोडले जाणे आवश्यक आहे, त्याकरीता चेंबरच्या माध्यमातून रेल्वे खात्याकडे पाठपुरावा सुरु आहे. त्या प्रयत्नास यश आले असून कोल्हापूर ते राजापूर रेल्वेमार्ग सर्वेक्षण करण्याचे रेल्वे खात्याने मंजूर केले आहे.

कोल्हापूर शहर हे धार्मिक व ऐतिहासिक शहर असल्याने कोल्हापूरचा पर्यटन दृष्ट्या विकास झपाट्याने होत आहे. परंतु पर्यटन विकासाला अनुषंगिक असणाऱ्या सोयी सुविधा उदा. रस्ते, मुबलक स्वच्छ पाणी, प्रवाशांच्या सोयीसाठी धर्मशाळा, वाहनतळ व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था आदि सुविधा होणे गरजेचे झाले आहे. त्याकरिता शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

केंद्र शासनाने नुकताच फुड सेफ्टी कायदा अंमलात आणलेला आहे. फुड सेफ्टी कायद्याप्रमाणे व्यापार-उद्योगाला मार्गक्रमण करावयाचे झाल्यास त्या कायद्याची माहिती सर्व संबंधित घटकांशी करुन घेणे आवश्यक आहे. कायद्यातील त्रुटी व अडचणीबाबत आपल्या सुचना कळविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कायद्यातील अडचणी दूर करण्याकरीता पाठपुराठा करता येईल.

केंद्र शासनातर्फे G. S. T. कायदा लवकरात लवकर लागू करण्याचा विचार आहे. G. S. T. आल्यानंतर इतर सर्व कर व स्थानिक कर रद्द होणे गरजेचे आहे. त्याकरीता संघटीतपणे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. G. S. T. लागू झाल्यानंतर स्थानिक कर कोणत्याही परिस्थितीत लागू न करुन घेण्यासाठी जागरुक राहणे गरजेचे आहे.

कोल्हापूरात हळूहळू रिटेल क्षेत्रातील मोठ्या गुंतवणुकदारांनी आक्रमण करुन रिटेल बाझार सुरु केले आहेत. त्यामुळे कोल्हापूरातील किरकोळ व्यापारावर त्याचा परिणाम होत आहे याबाबत व्यापारी उद्योजकांनी त्याची नोंद घेवून आपल्याही व्यापार उद्योगामध्ये योग्य त्या अद्ययावत सोयी सुविधा निर्माण करुन ग्राहकाला उत्तम सेवा देवून या आक्रमणास तोंड देणे गरजेचे आहे.

## संपादकीय



'कोल्हापूर चेंबर पत्रिके'चा हा अंक सुधारीत स्वरूपात आपल्या हाती देताना आंनद होत आहे.

व्यापार-उद्योग क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या घडामोडी वेगाने होत असताना कोल्हापूर च्या व्यापारी-उद्योजकांना जकात-एलबीटी च्या प्रश्नांवर १२ दिवस व्यापार-उद्योग बंद ठेवावे लागले यासारखी दुर्देवाची गोष्ट नाही.

या निमित्ताने व्यापाऱ्यांनी आपल्या अभुतपूर्व एकीचे दर्शन घडविले ही मात्र निश्चितच समाधानाची व आनंदाची घटना आहे.

कोल्हापूर चेंबर गेली २५ वर्षे या प्रश्नी सातत्याने लढा देत आहे. दिर्घकालीन धोरण म्हणुन कोणत्याही पर्यायाविना जकात रद्द व्हावी ही चेंबर ची भुमिका असुन चेंबर सदैव व्यापारी-उद्योजकांच्या हीतासाठीच कार्यरत राहील हे निश्चित आहे.

जकातीच्या प्रश्नावर राष्ट्रीय स्तरावर खासदार राहूल गांधीच्यापर्यंत हा विषय यशस्वीपणे मांडण्याचे श्रेय जसे कोल्हापूर चेंबर चे आहे. तसेच हा विषय आता 'जीएसटी' शी निगडीत करून 'जीएसटी' मध्ये या कराचा समावेश व्हावा यासाठी जीएसटी च्या समितीचे अध्यक्ष, बिहारचे उपमुख्यमंत्री ना. सुशीलकुमार मोदी यांच्याकडे हा विषय मांडला आहे.

इवकरच 'कोल्हापूर चेंबर' च्या पुढाकाराने केंद्रीय अर्थमंत्री ना. प्रणव मुखर्जी यांच्यासमवेत बैठक घडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

त्याचबरोबर कोल्हापूर विमानतळाचा प्रलंबित प्रश्न नुतन विमानवाहतुक मंत्री ना. अजित सिंग यांच्यासमोर नेला असुन, लवकरच रेल्वे च्या प्रश्नासंबंधी वरिष्ठ स्तरावर बैठकीचे प्रयत्न सुरू आहेत.

या विविध प्रश्नांमध्ये आपल्याला महाराष्ट्र चेंबर, इंडियन मर्चंटस् चेंबर, असोचेम, मराठा चेंबर, फिक्की, सीआयआय, सीअेआयटी या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील शिखर संस्थांचेही सहकार्य मिळत आहे.

समस्या सोडविण्यासाठी विविध स्तरांवरून प्रयत्न करीत असताना विकासासाठीही प्रयत्न होणे तितकेच गरजेचे आहे. आणि 'कोल्हापूर चेंबर' ही भूमिका निश्चितच यशस्वीपणे पार पाडेल यांची ग्वाही देत आहे.

'कोल्हापूर चेंबर पत्रिका' अधिक माहीतपूर्ण स्वरूपात यापुढील काळात नियमितपणे आपल्याकडे येत राहील व विकासाच्या या वाटचालीत आपली भूमिका योग्यप्रकारे मांडेल.



**ललित गांधी**

उपाध्यक्ष
कोल्हापूर चेंबर

KCCI
कोल्हापूर चेंबर पत्रिका

## ‘जीएसटी’ प्रणालीत जकात व एलबीटी च्या समावेशासाठी प्रयत्न करू – ना. सुशीलकुमार मोदी

### लवकरच व्यापक बैठक आयोजित होणार

**दिल्ली** – देशात सर्व राज्यांमधून हद्दपार झालेली परंतू फक्त महाराष्ट्रातच सुरू असलेली जकात कर प्रणाली अथवा जकातीच्या ऐवजी लावलेल्या पर्यायी करांचा ‘‘जीएसटी’’ प्रणाली मध्ये समावेशासाठी प्रयत्न करू असे आश्वासन देशातील सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा समावेश असलेल्या जीएसटी अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष व बिहारचे उपमुख्यमंत्री ना. सुशीलकुमार मोदी यांनी दिले.



**महाराष्ट्रातील जकात व एलबीटी रद्द करून त्याचा ‘‘जीएसटी’’ मध्ये समावेशनासाठी ना. सुशीलकुमार मोदी यांना निवेदन देताना कोल्हापूर चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी व खासदार दिलीप गांधी.**

राज्य व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संचालक व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी जकात व एलबीटी चा जीएसटी मध्ये समावेश करावा या मागणीसाठी ‘‘जीएसटी’’ च्या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष ना. सुशिलकुमार मोदी यांची भेट घेतली त्याप्रसंगी ते बोलत होते.

खासदार व पूर्व केंद्रीय मंत्री दिलीप गांधी यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक व व्यापारी विकासावर जकात व एलबीटीमुळे विपरीत परिणाम होत असल्याचे सांगुन याप्रश्नी लवकर निर्णय घेण्याची विनंती केली.

ललित गांधी यांनी चर्चेत पुढे सांगितले की महाराष्ट्रातील व्यापारी उद्योजक गेली २५ वर्षेजकात हटवण्यासाठी लढा देत आहेत. प्रत्येकवेळी शासनकर्त्यांनी वेगवेगळी आश्वासने देऊन आमची फसवणुक केली आहे.

राज्याच्या विकासासाठी मारक असलेला कर कायमचा रद्द करण्यासाठी ‘‘जीएसटी’’ प्रणाली मध्ये समावेश करून घेते ही आमच्यापुढील शेवटची संधी आहे. तसेच जकातीऐवजी लावलेला ‘‘एलबीटी’’ कर रद्द करण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाची माहितीही त्यांनी सुशीलकुमार मोदी यांना दिली.

यचवेळी ना. सुशीलकुमार मोदी यांनी महाराष्ट्राची मागणी योग्य असुन आपण याबाबत जातीने लक्ष घालु तसेच जरूर पडल्यास केंद्रीय अर्थमंत्री ना. प्रणव मुखर्जी यांचे समवेत व्यापक बैठक घडवुन आणु असे आश्वासनही दिले.

## कोल्हापूर व महाराष्ट्रातील विमानतळांच्या प्रश्नासंदर्भात लवकरच बैठक घेवू

### – नुतन केंद्रीय विमान वाहतुक मंत्री अजित सिंह

**दिल्ली** – ‘कोल्हापूर विमानतळाच्या प्रश्नासंदर्भात लवकरच बैठक घेवू’ असे आश्वासन नुतन केंद्रीय विमान वाहतुक मंत्री अजित सिंह यांनी दिले.

कोल्हापूर विमानतळाच्या प्रश्नांसंदर्भात कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे नुतन केंद्रीय विमान वाहतुक मंत्री अजित सिंह यांची भेट घेवून निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली त्याप्रसंगी ते बोलत होते. नाम. अजित सिंह यांची कॅबीनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छाही दिल्या.

कोल्हापूर विमानतळावरील विमान वाहतुक सेवा सद्या बंद असल्यामुळे कोल्हापुरच्या औद्योगिक विकासावर विपरीत परिणाम होत आहे तसेच नाईट लँडींगची सुविधा नसल्यामुळे विमान सेवेला येणाऱ्या मर्यादा तसेच छोट्या धावपट्टीमुळे बोईंग विमाने उतरू शकत नाही त्यामुळे मुंबई व्यतिरिक्त अन्य शहरे जोडण्याची मर्यादा येत आहे त्यामुळे विमान तळाचे विस्तारीकरण तातडीने होणे आवश्यक आहे तसेच विस्तारीकरणापर्यंत नियमित विमान वाहतुक सुरू रहावी यासाठी विमान वाहतुक मंत्रालयाने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे अशी मागणी केली

कोल्हापूर विमानतळाचे संस्थापक श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांचे नांव विमानतळास देणेत यावे, कोल्हापूरमध्ये नवीन उद्योग येण्यासाठी मोठ्या उद्योग समुहांना प्रोत्साहीत करणे, स्थानिक उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत व्यवसाय मिळवून देण्याबरोबरच मोठे उद्योग येण्यासाठी आणि जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान मिळविणे, पर्यटन विकास वाढीला चालना देणेसाठी विमानतळाचा विस्तार करणे अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे विमानतळ विस्तारीकरण झाल्यास उद्योग वाढीला पोषक वातावरण मिळणार असल्याची मागणी ललित गांधी यांनी केली.

या चर्चेनंतर अजित सिंह यांनी कोल्हापूर तसेच महाराष्ट्रातील विमान वाहतुक सेवा प्रश्नासंदर्भात संसदेचे अधिवेशन संपल्यानंतर लवकरात लवकर उचस्तरीय बैठकीचे आयोजन करू असे आश्वासन ललित गांधी यांना दिले.



**कोल्हापूर विमानतळाच्या प्रश्नासंदर्भात नुतन केंद्रीय विमान वाहतुक मंत्री अजित सिंह यांच्याशी चर्चा करताना चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी**

वर्ष : ३ ◆ अंक : १० ◆ फेब्रुवारी २०१२ ◆ पान नं.: ४ ◆

KCCI

# कोल्हापूर चेंबर पत्रिका

R.N.I. REGN. NO. MAHMAR/2009/36262 POSTING DATE : 10th OF EVERY MONTH RAJARAMPURI POST OFFICE, KOLHAPUR POSTAL : REGN. NO. KLP-302/2012-2014

## ‘त्रिनिदाद’ मध्ये नवीन उद्योग व सामाजिक उपक्रमांसाठी भारतीयांनी पुढाकार घ्यावा – पंतप्रधान-कमलाप्रसाद बिसेसार

**जयपूर –** ‘त्रिनिदाद व टोबॅगो’ या देशांमध्ये भारतीय उद्योजकांनी नवीन गुंतवणुक करावी असे आवाहन आफ्रिका खंडातील ‘त्रिनिदाद व टोबॅगो’ देशाच्या पंतप्रधान श्रीमती कमला प्रसाद बिसेसार यांनी केले.

‘अखिल भारतीय मारवाडी युवा मंच’ चे अध्यक्ष व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी प्रवासी भारतीय परिषदेच्या उद्घाटनासाठी भारत दौऱ्यावर असलेल्या ‘त्रिनिदाद’ च्या पंतप्रधान श्रीमती कमला प्रसाद बिसेसार यांची भेट घेऊन चर्चा केली त्याप्रसंगी त्यांनी हे विचार व्यक्त केले.

त्रिनिदाद च्या पंतप्रधान श्रीमती कमला प्रसाद यांनी त्रिनिदाद व टोबॅगो मध्ये भारतीयांना विविध क्षेत्रात गुंतवणुकीच्या अनेक संधी उपलब्ध असुन, नवीन उद्योग उभारणीसाठी विशेष सहाय्य व प्रोत्साहन योजना असल्याचेही सांगितले.

तसेच आरोग्य विषयक विशेषतः अपंग पुनर्वसन क्षेत्रात व शिक्षण क्षेत्रातील सामाजिक उपक्रम त्रिनिदाद मध्ये राबवावेत यासाठी त्रिनिदाद सरकार संयुक्तपणे आयोजन करेल असे सांगितले.

‘त्रिनिदाद’ च्या पंतप्रधान श्रीमती कमला प्रसाद यांनी ललित गांधी यांना शिष्टमंडळासह ‘त्रिनिदाद’ भेटीचे निमंत्रण दिले.



**त्रिनिदाद व टोबॅगो च्या पंतप्रधान श्रीमती कमला प्रसाद बिसेसार यांच्याशी चर्चा करताना चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी सोबत प्रसिध्द क्रिकेटपटू ब्रायन लारा**

## इंडसइंड बँकेतर्फे कार्यशाळा

इंडसइंड बँकेतर्फे आयात-निर्यातदारांसाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली. याला भरघोस प्रतिसाद मिळाला. गोकुळ शिरगाव मॅन्यु फॅक्चर्स असोसिएशन (गोशिमा), शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन (स्मॅक) आणि कोल्हापूर चेंबर्स ऑफ कॉमर्स यांच्यातर्फे ही कार्यशाळा हॉटेल वृषाली येथे झाली.




**इंडसइंड बँकेतर्फे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना चेंबरचे उपाध्यक्ष सुरेंद्र जैन शेजारी शाखाव्यवस्थापक यतीश शहा, सचिन रझदान आदि**

शाखा व्यस्थापक यतीश शहा यांनी प्रास्ताविक केले. विभागीय व्यवस्थापक गौतम अक्षरवाल यांनी बँकेची प्रगती आणि मिळालेल्या विविध सन्मानांची माहिती दिली. ‘इंडस एक्झी’ या अंतर्गत परदेशी चलनामधील विविध व्यवहारांची माहिती दिली. सचिन रझदान यांनी फॉरवर्ड, ऑप्शन, इसीबी, एलसी, आयात-निर्यात सेवा, परदेशी चलन खाते या सर्वांबाबत मार्गदर्शन केले. ‘गोशिमा’ चे अध्यक्ष अजित आजरी, चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष सुरेंद्र जैन, स्मॅकचे अध्यक्ष दादासाहेब लडगे यांनी ही कार्यशाळा उद्योग-व्यापारक्षेत्रासाठी मार्गदर्शन ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

**आपल्या संस्थेची/उत्पादनाची जाहीरात करण्यासाठी प्रभावी व उपयुक्त माध्यम**

**जाहीरातीचे दरपत्रक**

| | |
|---|---|
| आतील पुर्ण पान – ५,००० | आतील अर्धे पान – २,५०० |
| आतील पाव पान – १,५०० | तळातील स्ट्रीप – १,००० |

जाहीरातीचे आर्ट वर्क/ डिझाईन व जाहीरात रक्कमेचा कोल्हापूर येथे देय ड्राफ्ट कोल्हापूर चेंबर पत्रिका या नावे, जाहिरात व्यवस्थापक कोल्हापूर चेंबर पत्रिका, बिझनेस हाऊस, १६७७, ई, मेन रोड, राजारामपूरी १० वी गल्ली, कोल्हापूर-४१६००८ या पत्यावर पाठवावा.

**प्रेषक :**
**कोल्हापूर चेंबर कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज**
**कल्पतरू प्लाझा, १०८६/ए/१०४, ई वॉर्ड,**
**पहिला मजला, राजाराम रोड,**
**हेमकिरण डिझेल्स् समोर,**
**कोल्हापूर - ४१६००८**

प्रति,

Printed & Published by Shri Lalit GandhiÊ Printed at Sakal Papers Ltd., D-4, M.I.D.C, Shiroli, Kolhapur 416122 and published from Business House, 1677, E, Main Road Rajarampuri 10th Line, Kolhapur 416008. Ph.: 0231-2525251,Fax: 0231-2522201 Printer /Publisher/ Editor : Lalit Gandhi